महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१७

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

नागपूर शहरातील विकास योजनेअंतर्गत गुंठेवारी अधिनियम, २००१ नुसार पार्कचे आरक्षण असलेले ले आऊटस मुक्त केल्याबाबत

(१) १३७९ (२३-१२-२०१४). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.आशिष देशमुख (काटोल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील विकास योजनेअंतर्गत गुंठेवारी अधिनियम, २००१ नुसार पार्कचे आरक्षण असलेले ले आऊटस मुक्त केल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०१४ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ले आऊटस मधील भुखंडधारकांना नियमितीकरण शुल्काचे मागणी पत्र दिले आहे काय,

(३) असल्यास, त्यांना आकारलेल्या शुल्कात त्या ले आऊटस् चा संपूर्ण विकास होणार आहे काय,

(४) नसल्यास, शासनाद्वारे या ले आऊटच्या विकासाकरीता जास्तीचा निधी देण्यात येणार आहे काय,

(५) तसेच नागपूर सुधार प्रन्यासद्वारे डिमांड नोट दिली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०४-२०१७) : (१) होय. पार्कच्या आरक्षणाचे बाधित असलेल्या ९७ भूखंडापैकी ५ भुखंडावरील आरक्षण वगळण्यात आले असल्याचे निदर्शनास आले.

(२) जनहित याचिका ४०/२०१३ दाखल होण्यापूर्वी नियमितीकरणाची कार्यवाही झालेल्या भूखंडधारकांना नियमितीकरण शुल्काचे मागणीपत्र दिलेले आहे.

(३), (४) व (५) वेगवेगळ्या निधीतून तसेच नागपूर सुधार प्रन्यास निधीतून विकास होणे अपेक्षित असून नागपूर सुधार प्रन्यास कडून गुंठेवारी अभिन्यासामध्ये एकूण रु.२०० कोटी खर्च प्रस्तावित आहे.

पुणे येथील रामवाडी परिसरातील कल्याणी नगर ते विमानतळ रोड रस्त्याच्या भुयारी मार्गाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(२) ४२३३ (२४-१२-२०१४). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील रामवाडी परिसरातील कल्याणी नगर ते विमानतळ रोड व नगर रोड भुयारी मार्गाचे काम रखडलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदरच्या भुयारी मार्गाचे काम लवकरात लवकर पूर्ण होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे तसेच सदरहू भुयारी मार्गाचे काम अर्धवट स्थितीत असल्याची नेमकी कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०५-२०१७) : (१) होय.

(२) पुणे नगर रस्त्यावरील जुन्या रामवाडी जकातनाका चौकामध्ये कल्याणानगरकडून विमानतळाकडे जाण्याकरिता भुयारी एकेरी मार्गाचे काम पुर्ण करण्यात आले आहे. प्रत्यक्ष काम सिध्दार्थ नगर झोपडपट्टीतील नागरिकांशी चर्चा व समन्वय साधुन पुर्ण काम करण्यात आले आहे.

झोपडपट्टीतील काही नागरिकांनी १९८७ च्या मान्य डी.पी. नकाशानुसार रस्तारुंदीकरण करण्यास हरकत घेवून पुणे येथील न्यायालयात महानगरपालिकेविरुध्द दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे झोपडपट्टी सोडून उपलब्ध जागेत काम करण्यात आले. तसेच विमानतळाकडे जाताना उजवी बाजू म्हणजेच पुर्वेस आगरवाल याची मिळकत असून जागामालक यांनी पुणे येथील न्यायालयात भूसंपादन प्रक्रियेस आक्षेप घेऊन महानगरपालिकेविरुध्द दावा दाखल केलेला आहे. दोन स्वतंत्र दावे न्यायालयात दाखल असल्यामुळे व त्यामध्ये मनाई हुकूम असल्याने त्या बाजुचे काम अपेक्षित गतीने करण्यास कायदेशीर बाधा निर्माण झालेली आहे.

कल्याणीनगरकडून विमानतळाकडे जाणा-या या भुयारी मार्गातून माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये एकेरी वाहतुक सुरु करणेत आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

स्पार्क या सेवाभावी संस्थेस कांजूरमार्ग हरियाली गाव येथील इमारती बांधकाम करण्याचे आदेश दिल्याबाबत

(३) ७९७२ (०७-०४-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने प्रसिध्द केलेला शासन निर्णय दि. १७ मार्च, १९९८ च्या अनुषंगाने स्पार्क या सेवाभावी संस्थेस कांजूरमार्ग हरियाली गाव येथील इमारती बांधकाम करण्याचे आदेश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००३ साली श्री.चंद्रशेखर आयुक्त असतांना उक्त ठिकाणी आठ इमारती नियमित निविदा प्रसिध्द करून काम देण्यात आले होते व त्याचा टी.डी.आर प्राधिकरणाने विकून योग्य ती किंमत वसुली केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१० मध्ये १२ वर्षे जुना शासन निर्णयाच्या आधारे स्पार्क या संस्थेस इमारत बांधण्याचे काम देण्यात आले होते सदर इमारतीचे काम स्पार्क या संस्थेने परस्पर एका खाजगी ठेकेदारास विकून १०० कोटीचे नुकसान प्राधिकरणाचे केलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) : (१) होय.

कुर्ला ते ठाणे दरम्यान प्रस्तावित ५ व्या व ६ व्या रेल्वे मार्गिकेचे काम पूर्ण करुन रेल्वे प्रवाशांवर येणारा ताण कमी करण्याच्या दृष्टीकोनातून राज्य शासनाने रेल्वे प्रशासनाच्या सहाय्याने, दिनांक २७.३.१९९८ रोजी शासन निर्णय निर्गमित करुन राज्य शासनाच्या मालकीच्या मौजे हरियाली, कांजूरमार्ग (पूर्व) येथील न.भू.क्र. १२० ह्या भूखंडावर सदरील रेल्वे मार्गिकेने बाधीत होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे पुनवर्सन करण्याचे काम, झोपडपट्टी पुनवर्सनाचे तसेच प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचे काम करणाऱ्या मे. स्पार्क या अशासकीय सेवाभावी संस्थेस दिले.
(२) होय.
(३) नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

पनवेल (जि.रायगड) नगरपरिषदेची सन २००९ रोजी मंजूर झालेली नगरविकास योजना नगरपरिषदेकडे हस्तांतरीत करण्याबाबत

(४) ८१७७ (०६-०७-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) नगरपरिषदेची सन २००९ रोजी मंजूर झालेली नगरविकास योजना नगरपरिषदेकडे हस्तांतरीत करण्यासाठी संबंधित विभागाला आदेश होण्यासंदर्भाचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरविकास योजना नगरपरिषदेकडे हस्तांतरीत न केल्यामुळे पनवेल शहराचा विकास होण्यास अनेक अडथळे निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पनवेल शहराचा विकास होण्याच्या दृष्टिने नगरविकास योजना पनवेल नगरपरिषदेकडे हस्तांतरीत होण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०६-२०१७) : (१), (२) व (३) नगर रचना योजना क्र. १ (प्रथम फेरफार) शासनाने दिनांक ३१/८/२००९ च्या अधिसुचनेन्वये मंजूर केली आहे. सदर नगर रचना योजनेचे नकाशे व स्कीम बुक अधिप्रमाणित करण्याअनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधीकडून शासनास निवेदन प्राप्त झाले होते. सदर नगर रचना योजनेचे नकाशे व स्कीम बुक अधिप्रमाणित करुन संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे दिनांक १२/१/२०१६ च्या पत्रासोबत सर्वसंबंधितांना वितरीत करण्यासाठी शासनाने पाठविले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईसह राज्यातील प्रमुख पायाभुत सुविधा प्रकल्पाचे प्रस्तावाबाबत

(५) ८३०० (०६-०४-२०१५). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई व राज्यातील प्रमुख पायाभुत सुविधा प्रकल्पाचे प्रस्ताव शासनाचे बऱ्याच वर्षापासुन मंजुरीसाठी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकूण किती प्रस्ताव प्रलंबित आहेत व त्यांची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रस्तावांना मंजुरी देवून प्रकल्प तातडीने पुर्ण करणेबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१७) : (१), (२), (३) व (४)

- केंद्र शासन पुरस्कृत जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुननिर्माण अभियानाच्या युआयजी अंतर्गत १११ प्रकल्पांना केंद्र शासनाने मान्यता दिलेली असून युआयडीएसएसएमटी अंतर्गत ११० प्रकल्पांना केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे.
- केंद्र शासन पुरस्कृत जेएनएनयुआरएम अभियान मार्च, २०१४ अखेर संपुष्टात आले आहे.

सोलापूर जिल्हयातील यंत्रमाग टिकून राहण्यासाठी कारखानदारांना रस्ते व पाणी यांच्या सवलती देण्याबाबत

(६) ८९४० (१०-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील यंत्रमाग टिकून राहण्यासाठी कारखानदारांना रस्ते व पाणी यांच्या सवलती देण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधी यांनी मा.आयुक्त महानगरपालिका, सोलापूर यांचेकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीनुषंगाने कारखानदारांना रस्ते व पाणी तसेच इतर काही सवलती देण्याबाबत शासनाकडून कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१७) : (१) महानगरपालिका हद्दीतील औद्योगिक वसाहतीमध्ये रस्ते, पाणी इत्यादी सुविधा पुरविण्यात येतात.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाची स्थापना होऊन मंडळाकडे प्रत्यक्ष हमाली व लेव्ही जमा करण्याचे कामकाजाबाबत

(७) ११९६८ (०८-०४-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १३ फेब्रुवारी, १९९२ च्या अधिसूचनेद्वारे इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाची स्थापना होऊन मंडळाकडे प्रत्यक्ष हमाली व लेव्ही जमा करण्याचे कामकाज माहे ऑक्टोबर, १९९४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मंडळाकडे निरीक्षक, लिपिक व शिपाई इत्यादी कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने मंडळाचे कामकाज सुरू नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंडळाचे अस्तित्व नसल्यामुळे माथाडी मंडळाच्या कार्यक्षेत्रात निरीक्षणे करून अनोंदीत मालक व कामगारांना नोंदीत करून घेण्याचे काम ठप्प आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मंडळाकडील कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०६-०६-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. कारण दि. २८/२/१९९६ च्या शासननिर्णयान्वये मंडळासाठी निरीक्षक, लिपिक व शिपाई यांचे प्रत्येकी १ पद निर्माण करण्यात आलेले असून सद्यस्थितीत मंडळात एक निरिक्षक कार्यरत आहे. सदर निरिक्षकामार्फत मंडळाचे कामकाज नियमितपणे सुरु आहे.
(३) हे खरे नाही.
(४) शासनाने दिनांक ४/१०/२०१२ रोजीच्या शासननिर्णयान्वये मंडळातील रिक्त पदे भरण्यास मान्यता दिली आहे. सद्यस्थितीत माथाडी मंडळांसाठी सेवाप्रवेश नियमावली तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून दरम्यानच्या कालावधीत तात्पुरत्या स्वरुपात बाह्य यंत्रणेद्वारे कर्मचाऱ्यांची पदे भरण्याविषयी मंडळास कळविले आहे.

परभणी शहरातील मुख्य चौकांच्या दुरुस्ती व देखभाली अभावी दुरावस्था झाल्याचे तसेच मुख्य चौकांचे नामफलकच गायब झाल्याबाबत

(८) १३६६३ (०७-०४-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहरातील मुख्य चौकांच्या दुरुस्ती व देखभाली अभावी दुरावस्था झाल्याचे तसेच मुख्य चौकांचे नामफलकच गायब झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौकाच्या सुशोभिकरणासाठी निधीची कमतरता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दुरुस्तीच्या कामाकरिता तात्काळ निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०१७) : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील जेजुरी येथे खंडोबाच्या दर्शनासाठी आलेले भाविक कऱ्हा नदीच्या पात्रात मल्हार सागर जलाशयात बुडून मृत्युमुखी पडल्याबाबत

(९) १९२९३ (११-०८-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील जेजुरी येथे खंडोबाच्या दर्शनासाठी आलेल्या कऱ्हा नदीच्या पात्रात मल्हार सागर जलाशयात मागील दहा वर्षात किमान ५० पेक्षा अधिक भाविक बुडून मृत्युमुखी पडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाटबंधारे विभाग, जेजुरी नगरपरिषद प्रशासन व मार्तंड देवस्थान यांच्याकडून नदीपात्रात कुठलीही स्वच्छतागृहे, स्नानगृहे व कपडे बदलण्याची व्यवस्था करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जेजुरी येथे कऱ्हा नदी तिरावर घाट व्यवस्था, ध्यान मंदीर, अस्थी विसर्जन कुंड, महिलांसाठी स्नानगृहे, स्वच्छतागृहे निर्माण करण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०५-२०१७) : (१) अशा स्वरुपाच्या घटना घडतात हे खरे आहे.
(२) व (३) जिल्हाधिकारी, पुणे यांना याबाबत सर्व संबंधीत यंत्रणा जसे नगरपरिषद जेजूरी, पाटबंधारे विभाग व देवस्थान समिती यांचेसह संयुक्त बैठक आयोजित करुन योग्य ती कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे.

जळगावातील मेहरुण तलावाला गळती लागल्याने तलावातून शेकडो लिटर पाणी वाहून जात असल्याबाबत

(१०) २५२६९ (१४-०८-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगावातील मेहरुण तलावाला गळती लागल्याने तलावातून शेकडो लिटर पाणी वाहून जात असून शिवाजी उद्यानच्या बाजूने हे पाणी शहराकडे येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे दररोज हजारो लिटर पाणी वाया जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या होणाऱ्या गळतीमुळे सामाजिक वनीकरण विभागाचे ९ हेक्टर क्षेत्र बाधीत होत असून त्यामुळे होत असलेल्या दलदलीमुळे मुळकुजव्या रोगाचा प्रार्दुभाव होऊन संपूर्ण नर्सरी नष्ट होण्याच्या मार्गावर आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त तलावाची गळती थांबविण्याबाबत स्थानिक प्रशासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१७) : (१) होय, मेहरुण तलावाचे गळतीचे पाणी शिवाजी उद्यानातून मेहरुण स्मशान भूमीजवळील, जळगाव शहराकडे वाहून जाणाऱ्या नाल्यास मिळून, नाल्यामार्फत प्रवाहीत झाले होते
(२) होय.
(३) नाही.
(४) सदर तलावाची गळती थांबविण्याकरीता महानगरपालिकेमार्फत लोक सहभागातून कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

ओझर ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपालिकेत होण्याबाबत

(११) २८५११ (२१-०१-२०१६). श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओझर ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपालिकेत होण्याबाबत शासनाने दिनांक १८ ऑगस्ट, १९९८ साली उद्घोषणा प्रसिध्द केली व मा. उपविभागीय अधिकारी दिनांक ३० नोव्हेंबर, १९९८ रोजी आलेल्या हरकती विधीग्राह्य नसल्याचे फेटाळुन ह्या बाबत मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांनी शासनाला स्वयंस्पष्ट अहवाल दिलेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपालिकेचे सर्व निकष ओझर ग्रामपंचायत पुर्ण करीत असतांना केवळ प्रशासकीय दिरंगाईमुळे ओझर ग्रामपंचायतीचे रुपांतर २६ वर्षात नगरपालिकेत होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासकीय दिरंगाईमुळे ओझर गांवाच्या नागरीकांना विकासा पासुन दूर ठेवणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) असल्यास, ओझर ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपालिकेत करण्यासाठी शासन स्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कोणती कारणे आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०४-२०१७) : (१) होय.

(२) व (३) ओझर नगरपालिका स्थापन करण्याबाबत दि.१८.८.१९९८ अन्वये उदघोषणा प्रसिध्द करण्यात आली होती. त्याअनुषंगाने प्राप्त हरकतींचा विचार करुन त्या फेटाळण्याच्या अभिप्रायासह दि.१०.३.१९९९ अन्वये जिल्हाधिकारी यांनी शासनास प्रस्ताव सादर केला होता.

ओझर ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपालिकेत न होण्याबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. सदर याचिका न्यायालयाने दि.१९.१२.२००७ रोजी खारीज केली आहे.

(४), (५) व (६) ओझर ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपालिकेत करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी नाशिक यांच्याकडून नव्याने प्राप्त प्रस्ताव विचाराधीन आहे.

मुंबई, नवी मुंबई येथील इमारत बांधकामासाठी हरित मंजूरी (ग्रीन नोड) प्राप्त न करताच उभारलेल्या बेकायदा इमारतीबाबत

(१२) ३००८४ (२१-१२-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने हरित मंजूरीशिवाय इमारतींच्या बांधकामांना मुभा देत जारी केलेले आदेश राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने रद्द ठरविल्याने मुंबई, नवी मुंबई येथील इमारत बांधकामासाठी बंधनकारक असलेली हरित मंजूरी (ग्रीन नोड) प्राप्त न करताच उभारलेल्या शेकडो इमारतीचे भवितव्य धोक्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हरित मंजुरीअभावी होणाऱ्या बेकायदा इमारतीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) : (१), (२) व (३) अशी बाब नाही.

२०,००० चौरस मीटर पेक्षा जास्त बांधकाम असलेल्या इमारतींना पर्यावरणीय अनुमती घेणे बंधनकारक आहे. त्यापेक्षा कमी क्षेत्र असलेल्या इमारतींना पर्यावरणीय अनुमती घेण्याची आवश्यकता नसते. पर्यावरण विभागाची अनुमती न घेता बांधलेल्या इमारती आढळून येत नाही. त्यामुळे पर्यावरण विभागाच्या उक्त अधिसूचनेचे उल्लंघन झालेले नाही, असे नवी मुंबई महानगरपालिकेने स्पष्ट केलेले आहे.

श्रीबाग मध्यवर्ती ग्राहक मंडळाच्या रायगड बाजार या सहकारी ग्राहक भांडाराची इमारत बांधकाम करताना सीआरझेड उल्लंघन केल्याबाबत

(१३) ३०४६१ (२१-१२-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथील श्रीबाग मध्यवर्ती ग्राहक मंडळाच्या रायगड बाजार या सहकारी ग्राहक भांडाराची इमारत बांधकाम करताना सीआरझेड उल्लंघन केल्याप्रकरणी अलिबागाच्या नगरसेवकांना दोषी ठरविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०१-२०१७) : (१) हे खरे नाही.

सदर इमारतीच्या बांधकामास महाराष्ट्र कोस्टल झोन ॲथोरिटी कडून दिनांक २३/११/२०१५ अन्वये मंजूरी प्राप्त झाली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात महिलांसाठी स्वच्छतागृहांची स्थापना करणेबाबत

(१४) ३९६७० (१३-०५-२०१६). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक महानगरपालिकेने त्या-त्या शहराच्या गरजेनुसार महिलांच्या सोईसाठी सार्वजनिक महात्वाच्या ठिकाणी स्वच्छतागृहांच्या उभारणीसह त्यांच्या देखभाल व दुरुस्तीचा आराखडा दिनांक १९ जून पर्यंत तयार करण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार शहर महानगरपालिकेने आपल्या क्षेत्रातील महिलांची वाढती लोकसंख्या व तातडीची गरज लक्षात घेता मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाची तत्पर अंमलबजावणी करीत महिलांसाठीच्या स्वच्छतागृहांच्या उभारणीचा व त्यांच्या देखाभाल दुरुस्तीचा आराखडा तयार करण्याची मागणी वसई-विरार शहर महानगरपालिकेचे नगरसेवक यांनी दिनांक २४ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांकडे तसेच आयुक्त, वसई-विरार शहर महागनरपालिका यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात महिलांसाठी स्वच्छतागृहे स्थापन करण्यासंदर्भात कोणत्या स्वरुपाची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१७) : (१) होय.

(२) होय.

(३) शहरांमध्ये ठिकठिकाणी सार्वजनिक व पे ॲण्ड यूज तत्वावर शौचालय उभारुन पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था करणेत आलेली आहे.

सद्य:स्थितीमध्ये २५ ठिकाणी सार्वजनिक शौचालय उभारण्यास परवानगी दिली आहे. तसेच ५ ठिकाणी शौचालय बांधण्याच्या कामाची सुरुवात करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भाल व भोपर (ता.कल्याण, जि.ठाणे) गावाच्या डम्पिंग ग्राऊंडचे आरक्षण हटविण्याबाबत

(१५) ४१२२९ (१७-०५-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाल व भोपर (ता.कल्याण, जि.ठाणे) या गावात एमएमआरडीएच्या विकास आराखड्यामध्ये डंपिग ग्राउंडचे आरक्षण दाखविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डंपिंग ग्राउंडच्या आरक्षणाला दोन्ही गावातील स्थानिक नागरिकांनी विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर डंपिंग ग्राउंडचे आरक्षण हटविण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधींनी दिनांक १२ डिसेंबर, २०१५ च्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर डंपिंग ग्राउंडचे आरक्षण हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०६-२०१७) : (१) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये प्रसिध्द विकास योजनेमध्ये मौ.भाल, व्दारली, आडीवली, दावडी व वसार या गावांमधील सुमारे २६५ हेक्टर क्षेत्र घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाकरीता प्रस्तावित होते. मात्र शासनाने दिनांक ११/३/२०१५ रोजी कलम ३१(१) अन्वये प्रसिध्द केलेल्या सुचनेमध्ये मौ.दावडी व मौजे भाल येथील सुमारे १०० हेक्टर क्षेत्र घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाकरीता प्रस्तावित असून, उर्वरीत क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्याचे प्रस्तावित आहे.
(२) होय.
(३) होय.
(४) शासनाने दिनांक ११/३/२०१५ रोजीच्या सुचनेद्वारे प्रसिध्द केलेल्या फेरबदलावर उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

संगमनेर नगरपरिषदेच्या हद्दीतील अनियमित/अनधिकृत बांधकामांना लावण्यात येणारी शास्ती कमी करण्याबाबत

(१६) ४२८१४ (१३-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमनेर नगरपरिषदेच्या हद्दीतील अनियमित/अनधिकृत बांधकामांना घरपट्टीच्या दुप्पट एवढी शास्ती लावली जाते, त्यामुळे सामान्य नागरीकांना प्रचंड आर्थिक भार सहन करावा लागल्याने नागरीकांमध्ये असंतोष निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संगमनेर नगरपरिषदेच्या हद्दीतील अनियमित / अनधिकृत बांधकामांना शास्ती कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१७) : (१) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील दि. ४.१.२००८ च्या सुधारणे नुसार कलम १८९ अ नुसार अवैध बांधकामावर दरवर्षी अशा इमारतीवर बसविण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पट्टी एवढी शास्ती भरण्याची तरतुद विहित केली आहे.मात्र असा कर

व शास्ती गोळा करणे याचा अर्थ सदर बांधकाम विनियमित झाल्याचे समजता येणार नाही.

(२) व (३) नगर परिषदा / नगर पंचायती हद्दीतील अवैध बांधकामावरील शास्ती कमी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

कोल्हापूरातील शाहू जलतरण तलावाच्या गळतीबाबत

(१७) ४३०६३ (०३-०५-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरातील शाहू जलतरण तलाव बांधून १६ वर्षे पूर्ण झाली असून हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा तलाव बांधल्यापासून गळत असल्याने दर सहा तासांनी तलावावातील पाणी सव्वा फुटाने कमी होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तलावाची गळती थांबविण्याकरिता आतापर्यंत १४ लाख खर्च होऊनही अद्यापही या तलावाची गळती सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामात झालेल्या गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१७) : (१) काही प्रमाणात गळती होत आहे, हे खरे आहे.

(२) आयुक्त कोल्हापूर यांना याबाबत व्यक्तीश: पाहणी करुन एका महिन्याच्या आत आवश्यक ती उपाययोजना करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

स्मार्ट सिटी योजनेंतर्गत उपलब्ध होणारा रोजगार स्थानिक भूमीपुत्रांना मिळण्याबाबत

(१८) ४४९८० (०७-०५-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्राने "स्मार्ट सिटी" योजनेसाठी मुंबईची निवड केली आहे व त्यासाठी महानगरपालिकेला एका वर्षात १०० कोटी मिळणार आहेत, असल्यास, स्मार्ट सिटीसाठी निवड झालेल्या लोअर परळ आणि आसपासच्या परिसरात ६० लाख रोजगाराची संधी उपलब्ध होणार असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपलब्ध होणारा रोजगार स्थानिक भूमीपुत्रांना मिळण्याबाबत शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१७) : (१) अद्याप केंद्र शासनाने स्मार्ट सिटी योजने अंतर्गत मुंबईची निवड केली नाही परंतु स्मार्ट सिटी चॅलेंजमध्ये सहभागी होण्याकरीता राज्य उच्चाधिकार समितीने मुंबईची निवड संभाव्य स्मार्ट शहर म्हणुन इतर ९ शहरांसह केली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील महापालिकामध्ये आरक्षणाप्रमाणे अनुसूचित जातीच्या नगरसेवकांच्या जागा आरक्षित न ठेवल्याबाबत

(१९) ५२२०५ (१३-०५-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २६ महापालिकांमध्ये अनुसूचित जातीसाठी १३ टक्क्यांप्रमाणे ३३८ जागा ठेवणे आवश्यक असताना नगरसेवकांच्या केवळ २६० जागा राखीव ठेवण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यातील महापालिकेत १३ टक्क्यांप्रमाणे ३३८ नगरसेवकांच्या जागा आरक्षित ठेवणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१७) : (१) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १९८८ मध्ये कलम ५(ए) तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ५(३) मधील तरतूदींच्या आधारे राज्यातील २६ महानगरपालिकांमध्ये अनुसूचित जाती प्रवर्गासाठी एकूण २६८ जागा आरक्षित करण्यात आल्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने अहवाल सादर केला आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ प्रकल्पातील गिरगाव भागातील प्रकल्पबाधित रहिवाश्यांच्या पुनर्वसनाबाबत

(२०) ५४४३० (२९-०८-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ प्रकल्पातील गिरगाव भागातील प्रकल्प बाधित रहिवाश्यांच्या पुनर्वसनाचा आराखडा मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशनने तयार केला आहे काय,

(२) असल्यास, सदर आराखड्यास राज्य शासनाने मंजूरी दिली आहे काय,

(३) असल्यास, आराखड्यानुसार प्रकल्पबाधित रहिवाश्यांना किती चौरस फुटांचे घर व इतर सुविधा देण्यात येणार आहेत,
(४) अद्याप सदर आराखड्यास राज्य शासनाने मंजूरी दिली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१७) : (१), (२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ३३(७) चे तरतूदीनुसार प्रस्तावित असून त्याबाबतचा आराखडा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांनी तयार केलेला आहे.

सदर पुनर्वसनास अडचणी येत असल्याने विनिमयाच्या काही तरतूदींमध्ये शिथिलता देणेसाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने शासनाकडे संदर्भ केला होता. शासनाने आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांना विनियमामध्ये शिथिलता देणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ (१) खालील तरतुदीनुसार दिनांक १.१२.२०१६ रोजी निदेश दिलेले आहेत. प्रकल्पबाधित रहिवाशांना विनियम ३३(७) चे तरतूदीनुसार विहित क्षेत्राच्या सदनिका देणे अभिप्रेत आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत

(२१) ५४८२८ (२६-०८-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय माहे एप्रिल मध्ये घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महापालिका हद्दीतील शीळ, दिवा, देसाई, रिवरवूड पार्क या विभागामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महापालिकेच्या शीळ, दिवा, देसाई, रिवरवूड पार्क विभागामध्ये किती सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची आले आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१७) : (१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये मोफत वायफाय सुविधा अंतर्गत प्रत्येक प्रभाग समिती अंतर्गत ४० सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसवण्याचा निर्णय माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये घेण्यात आलेला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अद्यापपावतो ठाणे महानगरपालिका क्षेत्रात २८१ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले आहेत.
(४) लागू नाही.

गिरणी कामगार ज्या मिलच्या चाळीत राहात असतील तेथे घर देणेबाबत

(२२) ५६६५० (२९-०८-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरणी कामगार ज्या मिलच्या चाळीत राहात असेल तेथे किंवा पुनर्विकासात उभ्या राहणाऱ्या इमारतीत गिरणी कामगारांना घर देण्याचा लवादाने निर्णय दिलेला असतानाही एनटीसीने अमान्य केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एनटीसीने सदर निर्णय अमान्य करण्याची कोणती कारणे शासनास कळविली आहेत,

(३) असल्यास, गिरणी कामगारांना राहात असेल तेथे घर देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) : (१) ते (४) लवादाने दिलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीस नकार दिल्याची बाब खरी नसल्याचे एनटीसीने कळविलेले आहे. तथापि अशा चाळीत रहाणाऱ्या एनटीसीच्या व्यवस्थापन कर्मचाऱ्यांच्या (Management cadre employees) संबंधात विवाद न्यायप्रविष्ट असून ते प्रलंबित आहेत.

क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेची व्याप्ती वाढवण्याबाबत

(२३) ५७२२९ (२६-०८-२०१६). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेअंतर्गत काही वर्षापूर्वी शासनाने दक्षिण मुंबईतील चाळींचा पुनर्विकास केला होता सदर योजनेची व्याप्ती वाढवून उपनगरात रखडलेल्या जुन्या इमारतींचा पुनर्विकास क्लस्टर डेव्हलमेंट योजनेअंतर्गत करण्याचे विचाराधीन असल्याचे सूतोवाच शासनाने दिनांक २६ मे, २०१६ वा त्या सुमारास केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विकासाचा उपनगरांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्याचे काम "निरी" या संस्थेवर सोपवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे काम किती कालावधीमध्ये पूर्ण होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) : (१) ते (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने उपनगरामध्ये क्लस्टर डेव्हलपमेंट योजना राबविण्याच्या अनुषंगाने आघात मूल्यमापन अहवाल (Impact Assessment Report) निरी या संस्थेकडून तयार करुन घेतलेला असून शासनास सादर केलेला आहे. सदर अहवाल विचारात घेवून तसेच मा.उच्च न्यायालयाकडील जनहित याचिका क्र.६१/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेले अंतरिम आदेश विचारात घेवून शासनाने मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्याच्या पूर्ततेसापेक्ष उपनगरासाठी नागरी नूतनीकरण योजनेबाबत (क्लस्टर डेव्हलपमेंट) निर्णय घेतलेला आहे. मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

झरीजामणी नगरपंचायत (जि.यवतमाळ) येथील विकास कामांबाबत

(२४) ६३९७४ (२९-०८-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झरीजामणी (जि.यवतमाळ) येथे नगरपंचायत झाल्यापासून ते आजपर्यंत कोणतीही विकासकामे हाती घेण्यात आली नसल्यामुळे नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिसरातील गटारांची स्वच्छता गेल्या अनेक मिहन्यांपासून करण्यात आलेली नसल्याने मोठया प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरले असून रोगराई पसरून स्थानिक जनतेचे आरोग्य धोक्यात येण्याची भीती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०४-२०१७) : (१) व (२) १४ वा वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन करण्याकरीता झरीजामणी नगरपंचायतीने निविदा मागविल्या असून सदर निविदेस सभेची मान्यता मिळालेली असून प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीकरीता असून प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीकरीता जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे. तसेच सर्वसाधारण रस्ता निधी अंतर्गत विविध प्रभागामध्ये रस्ता खडीकरण तसेच सिमेंट रस्त्याचे काम चालू आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

अण्णासाहेब पाटील मागास विकास महामंडळातील कर्मचाऱ्यांना
६ वा वेतन आयोग लागू करण्याबाबत

(२५) ६४९९८ (१०-०१-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अण्णासाहेब पाटील महामंडळाने पत्रक अपाम/वेतनश्रेणी/०९ दि. ३१.०७.२००९ नुसार महामंडळाला ६ वा वेतन आयोग लागू करण्यास शासनाकडे शिफारस केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाच्या दि. १४.०८.२००६ रोजीच्या २८ व्या बैठकीमध्ये महामंडळातील श्री संजय जाधव यांना सहाय्यक या पदावर सामावून घेऊन त्याप्रमाणे त्यांना वेतन व भत्ते निश्चित करून अदा करण्याबाबतचा ठराव घेण्यात आला असून सदर ठरावानुसार श्री संजय जाधव यांना त्यांचे जावक क्र. ३१७/१२ दि. २९.३.२०१२ नुसार वेतन निश्चीतीचे कार्यालयीन आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कार्यालयीन आदेशाचे पालन महामंडळाने केले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महामंडळात सहाय्यक या पदावर कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना श्री संजय जाधव यांच्यापेक्षा जास्त वेतन दिले जाते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२१-०४-२०१७) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहराचा स्मार्ट सिटी म्हणून विकास करण्याबाबत

(२६) ६६३९२ (१६-०१-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराचा स्मार्ट सिटी म्हणून करण्यात येणारा विकास हा कर्ज न काढता केंद्र व राज्य शासनाच्या सहभागातून करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे पुणे महापालिका आयुक्तांमार्फत माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०६-२०१७) : (१) नाही.

आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी त्यांच्या अहवालात याबाबत कोणतेही निवेदन शासनास सादर केले नसल्याचे नमुद केले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील माथाडी कामगाराच्यां विविध समस्यांबाबत

(२७) ७०५३१ (१६-१२-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमधील कष्टकरी घटक असलेला माथाडी कामगार हा केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजनांपासून वंचित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या माथाडी कामगारांना घरकूल, पिवळे रेशन कार्ड व मंजूर पेन्शन योजनेचा लाभ मिळण्यासाठी अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२५-०४-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीमधील माथाडी कामगारांसाठी योजना अस्तित्वात नाही. तथापि, शासनाच्या विविध विभागामधील राबविण्यात येणाऱ्या घरकुल योजनेच्या पात्रतेच्या निकषांची पूर्तता करणाऱ्या माथाडी कामगारांना सदर योजनेचा लाभ घेता येईल.

अ.ना.पु. व ग्रा.सं. विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार केंद्र शासनाच्या कार्यक्रमांतर्गत गरीबांना केंद्रस्थानी मानून दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना सवलतीच्या दराने अन्नधान्य पुरविण्याची योजना राज्यात दिनांक १ जून, १९९७ पासून सुरु करण्यात आली.

राज्य शासनाने आयआरडीपीच्या १९९७-९८ च्या यादीत नाव समाविष्ट असलेल्या व रु. १५,०००/- किंवा त्यापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबांना पिवळ्या शिधापत्रिका देण्याचा निर्णय घेतला. या निकषांच्या आधारे पिवळ्या शिधापत्रिका मिळण्यास पात्र असलेली सर्व कुटुंबे या योजनेचे लाभधारक असतील, यास्तव, माथाडी कामगारांना वेगळ्याने पिवळी शिधापत्रिका वितरीत करण्याचा प्रश्न उद्भवतनाही.

माथाडी कायद्यांतर्गत माथाडी कामगारांच्या कल्याणाकरिता विविध लाभ जसे बोनस, भविष्य निर्वाह निधी (पी.एफ), उपदान (ग्रॅज्युटी) अपघात नुकसान भरपाई इत्यादी लेव्हीद्वारे (नोंदीत मालकाकडून घेऊन) दिले जातात. पेन्शन योजनेचा समावेश नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुर्तीजापूर शहरातील पुरातन व जुन्या असलेल्या नगर परिषदेच्या शाळांची व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहाची झालेली दूरवस्था

(२८) ७३९०२ (२१-०४-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुर्तीजापूर शहरातील इंदिरा गांधी नगरपालिका शाळा, सावित्रीबाई फुले नगरपालिका शाळा, राजीव गांधी नगरपालिका शाळा तसेच उर्दू प्राथमिक शाळा या शाळांमध्ये असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह यांची दुरवस्था झाली असून शाळांमध्ये घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे अशी तक्रार तेथील कार्यकर्त्यांनी मुख्याधिकारी, मुर्तीजापूर नगरपालिका यांचेकडे दिनांक ०२ ऑगस्ट २०१६ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०५-२०१७) : (१) तक्रार केली हे खरे आहे.

(२) या संदर्भात मुर्तिजापूर नगरपरिषदेने चौकशी केली असून त्यामध्ये कोणतेही तथ्य आढळुन आलेले नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहाची दुरुस्ती मुर्तिजापूर नगरपरिषदेने या पुर्वीच केलेली असून नगरपरिषदेच्या शाळांमध्ये कोणत्याही प्रकारचे घाणीचे साम्राज्य नसुन शाळांची व शाळा परिसरांची दररोज साफसफाई होत आहे. त्याचप्रमाणे शाळांचे बांधकाम नव्यानेच झाले असून कोणत्याही प्रकारे दुरावस्था झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्र हटविण्यास केलेला विरोध

(२९) ७३९९० (२०-०४-२०१७). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील अतिक्रमणे हटवित असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्र हटविण्याची कारवाई सुरु असताना दलितांनी सदर केंद्र हटविण्यास विरोध केल्याने सदर केंद्रावरील कारवाई स्थगित करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर केंद्राला मान्यता देवून सदर केंद्र न हटविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०५-२०१७) : (१) व (२) धुळे शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्ययन केंद्राची जागा ही रस्त्यापैकी होती. दि.०४.०१.२०१७ रोजी कार्यकर्त्यांनी तीव्र विरोध केल्यामुळे महानगरपालिकेस सदरचे अतिक्रमण काढता आले नाही.

तथापि, दि.१२.०१.२०१७ रोजी अध्ययन केंद्राच्या कार्यकर्त्यांच्या सहमतीने सदर अतिक्रमण काढण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक येथील गोदावरी किनाऱ्यालगत सायकल ट्रॅक बांधण्याबाबत

(३०) ७४२४९ (२०-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील गोदावरी किनाऱ्यालगत १६ कि.मी. चा सायकल ट्रॅक बांधण्याच्या प्रस्तावास महापालिकेने मंजुरी दिलेली असून सदरचा प्रस्ताव हा निरी या संस्थेच्या नियमावलीमुळे प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी देण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०५-२०१७) : (१) व (२)

- नाशिक शहरातील गोदावरी नदी किनाऱ्यालगत ९ कि.मी. लांबीचा सायकल ट्रॅक बांधण्याच्या प्रस्तावित कामासाठी महासभेच्या मंजुरीनंतर दिनांक १०.०७.२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेस प्रतिसाद मिळालेला नाही.
- प्रस्तावित सायकल ट्रॅक हा गोदावरी नदी तीरावर पूररेषेत येत आहे.
- मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पुररेषेतील विकासाबाबत, निरी या संस्थेने खालीलप्रमाणे सूचना केल्या आहेत.

  १. नदी किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात खोदकाम व भराव करु नये व झाडे-झुडपे काढून टाकु नये.

  २. नदी किनारी हरित पट्ट्यामध्ये सायकल ट्रॅक करावयाचा असल्यास त्याच्या बांधकामासाठी पाणी मुरण्यासाठी सुयोग्य बांधकाम साहित्याचा (permeable materials) वापर करावा.

वरील सुचना विचारात घेऊन व नुकत्याच मंजुर झालेल्या बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदी विचारात घेऊन सायकल ट्रॅक बांधण्याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे महापालिकेच्या सफाई कर्मचा-यांना गत दहा वर्षापासून गणवेश देण्यात आलेला नसल्याबाबत

(३१) ७४३६८ (२०-०४-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांना गत दहा वर्षापासून गणवेश देण्यात आलेला नाही, याशिवाय गमबूट, रेनकोट, छत्री, स्वेटर, इ. साहित्यही मिळालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या सफाई कर्मचा-यांना घरे देण्यात आली आहेत त्यांच्याकडून घरभाडे वसूल करु नये असा आदेश सन २०१४ मध्ये झालेला असतानाही महापालिका भाडे वसूल करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सफाई कर्मचा-यांना आवश्यक साहित्य पुरविण्यासोबतच त्यांचे घरभाडे वसूल न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) : (१) धुळे महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांना सन २०११-१२ मध्ये गणवेश व इतर साहित्य वाटप करण्यात आलेले आहे.

(२) शासन निर्णयानुसार २५ वर्षांपेक्षा जास्त सेवा झालेल्या कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची, ते राहत असलेली घरे त्यांच्या नावे करण्यात आली आहेत. अशा कर्मचाऱ्यांकडून घरभाडे वसूल केले जात नाही.

(३) सफाई कर्मचाऱ्यांना सन २०१७-१८ या वर्षात गणवेश व इतर साहित्य वाटप करण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे महानगर परिवहन मंडळाच्या ताफ्यातील भाडेतत्वावरील बसेसच्या भाडेदरात गैरव्यवहार झाल्याबाबत

(३२) ७४३९६ (२०-०४-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर परिवहन मंडळाच्या ताफ्यातील भाडेतत्वावरील बसेसच्या भाडेदरात मोठा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीएमपीला सध्या बसेस पुरविणाऱ्या एका कंपनीने एसी बसेस ४८ रु. दराने देण्याचे निविदेत असून दुसऱ्या एका कंपनीने सुमारे ६१ रुपये किमी दराने बसेस पुरविण्याचे नमूद केले आहे त्यामुळे एकूण भाडेतत्वावरील घेतलेल्या आणि घेतल्या जाणाऱ्या बसेस च्या व्यवहारात मोठा गैरव्यवहार झाल्याची साशंकता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्या बसेससाठी पीएमपीला मोजावे लागणारे पैसे आणि एसी बसेसला मोजावी लागणारी रक्कम याचा विचार करता भाडेतत्वावरील बसेसच्या व्यवहारात गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत असल्याने शासनाकडून याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०५-२०१७) : (१), (२) व (३) पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या आयुर्मान संपलेल्या व ताफ्यातून बाद कराव्या लागणा-या बसेसची संख्या विचारात घेऊन भाडेतत्वावर ५५० वातानुकूलित बीआरटी बसेससाठी सन २०१६ मध्ये निविदा राबविल्या होत्या. त्यानुसार मे, ट्रन्झीट ऑपरेशन्स इंडिया प्रा. लि. यांनी कमीत कमी प्रती कि. मी. दर रु.४७.०० एवढा दिलेला असल्याने संचालक मंडळाच्या मान्यतेनुसार बसेस उपलब्धतेची प्रक्रिया करण्यात आली होती.

चौथ्या टप्यातील भाडे तत्वातील साध्या बसेसचा (इंधनासह) प्रती कि. मी. सध्याचा दर महामंडळाकडे रु.४९.४९ इतका आहे. तर नव्याने घेण्यात येत असलेल्या भाडेतत्वावरील ५५० बीआरटी बसेस वातानुकूलित असून या बसेसचा प्रति कि.मी. दर रु. ४७.०० (इंधन वगळून) असा प्राप्त झाला आहे. यामध्ये विविध अत्याधुनिक उदा. सीसी टिव्ही प्रणाली, नियोजनात्मक वेळपत्रक संगणक प्रणाली, स्टोअर व देखभाल संगणक प्रणाली, ई टिकिटींगला एकरुप करणारे व्हॅलीडेटर, सुसज्ज आयटीएमएस सिस्टीम इ. सुविधा पुरविण्याचे बंधनकारक केले आहे.

उपरोक्त कार्यवाही केंद्र शासनाच्या असोसिएशन ऑफ रोड ट्रान्सपोर्ट अंडरटेकिंग या संस्थेच्या माध्यमातून केलेली असल्यामुळे या भाडेतत्वावरील बसेसच्या व्यवहारात गैरव्यवहार झाला आहे ही बाब वस्तुस्थितीस धरुन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे जिल्हयातील पांझरा नदी सुशोभिकरणाच्या प्रस्तावाबाबत

(३३) ७४४९४ (२०-०४-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हयातील पांझरा नदी सुशोभिकरणासाठी महापालिकेतर्फे राज्य नदी संवर्धन योजनेंतर्गत २५२ कोटी ५८ लाख रुपयांचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावातील तांत्रिक त्रुटींसह नदी संवर्धन योजनेंतर्बत निधी उपलब्ध नसल्याने हा प्रस्ताव शासनाने नाकारला असल्याने नदी सुधारण्याचा प्रकल्प प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या प्रस्तावावरील त्रुटी दूर करुन केंद्राकडे फेरप्रस्ताव पाठवून त्याचा पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) : (१) होय.
(२) धुळे महानगरपालिकेचा रु.२५२.५८ कोटींचा पांझरा नदी सुधार प्रस्ताव पर्यावरण विभागामार्फत केंद्र शासनास पाठविण्यात आला होता. तथापि, सदर प्रस्ताव परिपूर्ण नसल्याने तो परत करण्यात आला आहे.
(३) धुळे शहरातील मलनि:सारण प्रकल्पाचा अमृत अभियानाच्या सन २०१७-१८ च्या आराखड्यात समावेश करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक महानगरपालिकेने सुरु केलेल्या घंटागाडी आदर्श योजनेचा अयशस्वी ठरल्याबाबत

(३४) ७४५६७ (२१-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये सुरु केलेल्या घंटागाडी आदर्श योजनेचा बोजवारा उडाल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आदर्श योजनेवर २०६ घंटागाडया कार्यान्वीत करण्यात आलेल्या असतांना केवळ १६५ घंटागाडया कार्यरत आहेत ही बाब देखील निदर्शनास आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेचा बोजवारा उडाल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे, हेही खरे आहे काय.
(४) असल्यास, या नुकसानीस जबाबदार असणाऱ्या संबधितांची चौकशी करण्यात येऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) निविदा अटी शर्तीनुसार कामकाज न केल्यास महानगरपालिकेमार्फत संबंधित मक्तेदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक येथे मे.टेरॉकॉन इकोटेक प्रा.लिमिटेड या एजन्सीमार्फत वृक्षांची गणना करण्याचे काम संथ गतीने सुरु असल्याबाबत

(३५) ७४६५८ (२०-०४-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे प्रतिदिन दहा हजार तर प्रतिमाह अडीच लाख वृक्षांची गणना करण्याचा दावा करणाऱ्या महापालिकेने नियुक्त केलेल्या मुंबईच्या मे. टेरॉकॉन इकोटेक प्रा.लिमिटेड या एजन्सीमार्फत शहरात वृक्ष गणनेचे काम संथगतीने सुरु असून दीड महिन्यात पावणेदोन लाख वृक्षांचीच गणना होवू शकली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, माहे जून अखेर पर्यंत महापालिकेने सदर एजन्सीला सुमारे २५ लाख वृक्षगणनेचे उदीष्ट दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन एजन्सीकडून निर्धारित वेळेत वृक्ष गणनेचे काम करुन घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०५-२०१७) : (१) व (२) अंशत: खरे आहे.

नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील अंदाजे २५ लक्ष वृक्षाची गणना करण्याचे काम मे.टेरॉकॉन इकोटेक प्रा.लि., मुंबई यांना देण्यात आले आहे.

सदर काम दिनांक २१.१२.२०१६ ते २०.१२.२०१७ या कालावधीत करावयाचे असून, आजपर्यंत ९.७८ लक्ष इतक्या वृक्षांची गणना करण्यात आली आहे.

(३) संबंधित एजन्सीमार्फत करण्यात येत असलेले वृक्ष गणनेचे काम प्रगतीपथावर असून, सदर काम अधिक वेगाने करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत एजन्सीकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक येथे प्रधानमंत्री आवास योजनेच्या बनावट अर्जाची विक्री केली जात असल्याबाबत

(३६) ७४६६३ (२०-०४-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे केंद्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री आवास योजनेचे कामकाज महापालिकेमार्फत केले जाणार असून त्यासाठी झोपडीनिहाय सर्वेक्षण केले जाणार असल्याचे माहे जानेवारी, २०१७ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वेक्षणापूर्वीच या योजनेच्या बनावट अर्जाची विक्री ५० ते १०० रुपये शुल्क घेवून केली जात असल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या प्रकाराची गंभीर दखल घेवून संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१७) : (१) होय.

नाशिक महानगरपालिकेमार्फत नाशिक रोड, सातपूर, नाशिक पश्चिम, नाशिक पुर्व, नविन नाशिक व पंचवटी विभागातील झोपडीनिहाय सर्व्हेक्षण करण्याबाबत कार्यादेश दिनांक ३१.१२.२०१६ व ०४.०१.२०१७ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक महापालिकेने निवडलेल्या कंपन्याकडून उदिष्टपूर्तीसाठी वृक्षरोपणाच्या शास्त्रीय पध्दतीकडे दुर्लक्ष केले जात असल्याबाबत

(३७) ७४६६५ (२०-०४-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथे दहा फुटांचे २१ हजार रोपे लागवडीचे उदीष्ट गाठण्यासाठी महापालिकेने निवडलेल्या कंपन्यांकडून उदिष्टपूर्तीसाठी वृक्षरोपणाच्या शास्त्रीय पध्दतीकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे माहे जानेवारी, २०१७ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शास्त्रीय दृष्टया वृक्षलागवडीची अट बंधनकारक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०५-२०१७) : (१) हे खरे नाही.

मा.उच्च न्यायालयाने नेमलेल्या तज्ञ समितीने शिफारस केल्यानुसार, नाशिक महानगरपालिकेमार्फत वृक्षांची लागवड करण्यासाठी खाजगी एजन्सीची नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच सदर एजन्सीला शास्त्रीय दृष्ट्या वृक्ष लागवड करण्याचे बंधनकारक करण्यात आले असून, लागवड केलेल्या वृक्षांची देखभाल नियमितपणे करण्यात येत आहे. तसेच सदर काम योग्य रितीने व निर्देशानुसार सुरु आहे.
(२) सदर वृक्षरोपणाच्या सद्यस्थितीबाबतचे सर्वेक्षण सामाजिक वनीकरण विभाग यांचेमार्फत प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक महापालिकेच्यावतीने मिळकती सर्वेक्षणासाठी देण्यात आलेल्या ठेकेदार कंपनीचे कर्मचारी कोणत्याही पूर्वतयारीशिवाय मिळकत सर्व्हेक्षण करीत असल्याबाबत

(३८) ७४९२५ (२०-०४-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महापालिकेच्या वतीने मिळकती सर्वेक्षणासाठी देण्यात आलेल्या ठेकेदार कंपनीचे कर्मचारी कोणत्याही पूर्वतयारीशिवाय मिळकत सर्व्हेक्षण करीत असून नागरिकांकडेच मिळकतींचे पुरावे मागत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे ज्या भागात सर्व्हेक्षण करण्यासाठी हे कर्मचारी जातात त्यांना तेथील सर्वे क्रमांकच माहित नसतील तर सर्वेक्षणाचे काम कसे होणार असा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन या कर्मचा-यांना पूर्वतयारीचे प्रशिक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०५-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) महानगरपालिकेच्या वतीने मिळकतींचे सर्व्हेक्षणासाठी ठेकेदार कंपनीमार्फत नियुक्त केलेले कर्मचारी हे अभियांत्रिकी / आय.टी.आय. आरेखक या शैक्षणिक पात्रतेचे आहेत. सदर कर्मचारी मिळकतींमधील चटई क्षेत्र मोजणे यासाठी सदर मिळकतीचे बांधकाम परवानगी दाखला, बांधकाम पुर्णत्वाचा दाखला इत्यादी माहिती प्राप्त करतात. सदर सर्व्हेक्षणाचे काम पारदर्शी होण्यासाठी महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेली मिळकतींची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही.

याबाबत सदर कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेमार्फत प्रशिक्षण देण्यात आले असून, प्रत्यक्ष सर्व्हे कामकाजास सुरुवात करण्यात आलेली आहे.

सदर सर्व्हेक्षणाचा मुळ उद्देश हा बांधीव मिळकतींचे मोजमाप करणे, त्यामध्ये मिळकतीत केलेले वाढीव बांधकाम, वापरात बदल इत्यादी मिळकती ज्या टॅक्स नेटमध्ये आलेल्या नाहीत त्यांचा समावेश करणे असा आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूरवासियांना शुध्द आणि मुबलक पाणी थेट पाईपलाईनद्वारे उपलब्ध करून देण्याबाबत

(३९) ७५१०६ (२०-०४-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरवासियांना शुध्द आणि मुबलक पाणी थेट पाईपलाईनद्वारे उपलब्ध करुन देण्यासाठी योजनेचे थर्ड पार्टी ऑडिट झाल्याशिवाय रुपये २७८ कोटींचा निधी त्वरित मिळणार नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेचे ऑडिट करण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, केंद्राचा अर्थसंकल्प लवकर असल्याने ऑडिट रिपोर्ट तातडीने पोहचविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०५-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.
• केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी अभियानांतर्गत काळम्मावाडी धरणातून कोल्हापूर शहरास थेट पाईपलाईन योजनेच्या रु.४२५.४१ कोटी किंमतीच्या प्रकल्पास शासनाने मान्यता दिली असून सदर प्रकल्पासाठी केंद्र व राज्य शासन हिश्याचा एकूण रु.१९१.४३ कोटी निधी वितरीत केला आहे. पुढील उर्वरीत निधीसाठी आवश्यक उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास सादर केलेले आहे.
(२), (३) व (४) • सदर योजनेचे थर्ड पार्टी तांत्रिक ऑडीट करुन घेणे करिता डिपार्टमेन्ट ऑफ सिव्हील इंजिनिअरींग, गर्व्हमेंन्ट कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांची नियुक्ती करणेत आलेली आहे.
• त्यांचेकडून योजनेचे तीन टप्यामध्ये थर्ड पार्टी तांत्रिक ऑडीट करणेत येणार आहे.
• सदर योजनेमध्ये झालेल्या कामांचे पहिल्या टप्याचे ऑडीट पूर्ण झाले असून त्यांचेकडून पहिल्या टप्याचा तांत्रिक ऑडीट रिपोर्ट कोल्हापूर महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे.

धुळे महापालिकेत नविन कर्मचाऱ्यांची भरती झाली नसल्याबाबत

(४०) ७५१३३ (२०-०४-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे महापालिकेत काही वर्षापासून नविन कर्मचाऱ्यांची भरती झाली नसल्याने सद्यस्थितीत सुमारे ८०० कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरवर्षी साधारणपणे ५० कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे येथे कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी यांच्यावरील कामाचा ताण लक्षात घेता येथील आवश्यक ८५० पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१७) : (१) धुळे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर पुर्वीची १४२४ पदे मंजुर असून, त्यापैकी २५० पदे रिक्त आहेत.

सुधारित आकृतीबंधानुसार ८५० नविन पदांना मंजुरी देण्यात आली आहे.

(२) दरवर्षी साधारणत: विविध संवर्गातील २० ते ३० कर्मचारी सेवानिवृत्त होतात.

(३) धुळे महानगरपालिकेच्या सुधारित आकृतीबंधानुसार, सर्व संवर्गांची बिंदुनामावली अद्ययावत करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे. सद्यस्थितीत धुळे महानगरपालिकेचा आस्थापना खर्च हा विहीत केलेल्या (३५%) मर्यादेपेक्षा जास्त आहे. आस्थापना खर्च विहित मर्यादेत आल्यानंतर महानगरपालिकेस पदे भरता येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मालेगांव (ता.जि.नाशिक) येथील महानगरपालिका वॉर्ड नं.३८ येथील विविध कामांची देयके काम न करता अदा केल्याबाबत

(४१) ७५३७२ (२०-०४-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) येथील महानगरपालिका वॉर्ड नं.३८ येथील विविध कामांची निविदा दिनांक १४.३.२०१६ रोजी काढण्यात आली परंतू तदनंतर या वॉर्ड मधील कामे न करता देयके अदा करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव मालेगांव महानगरपालिकेचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याचे लक्षात घेता सदरील कामाची सखोल चौकशी करुन दोषापिंतावर शासन आवश्यक कारवाई करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०५-२०१७) : (१) मालेगाव महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.३८ मधील विविध विकास कामांसाठी महानगरपालिकेमार्फत दिनांक १४ मार्च, २०१६ रोजी निविदा मागविली होती हे खरे आहे.

तथापि, कार्यादेशाप्रमाणे झालेल्या कामांची देयके अदा करण्यात आलेली असून, विकास कामे न करताच देयके अदा करण्यात आली आहे, ही बाब खरी नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मालेगांव शहरात (ता.जि.नाशिक) उद्यान बनविण्याच्या कामाबाबत

(४२) ७५६२२ (२०-०४-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) येथे मालेगांव शहरात उद्यान बनविण्याच्या कामासंदर्भातील प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरिता शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त उदयानाच्या कामासाठी सविस्तर प्रकल्प अहवालाची किंमत रु ४ कोटी इतकी असून निधी विना उदयानाच्या कामांना सुरुवात होत नाही हे लक्षात घेता शासन याबाबत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१७) : (१) मालेगाव शहरात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत उद्यान विकासाचे रु.४.७३ कोटी रकमेचे प्रस्ताव तयार करण्यात आले असून, प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे सादर करण्यात आले आहे.
(२) सदर प्रस्तावाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करण्याचे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मे २०१५ मधील गव्हाणपाडा मुलुंड येथील म्हाडाच्या सोडतीतील सदनिकांचे बांधकाम तातडीने पूर्ण करुन ताबा देण्याबाबत

(४३) ७६०१५ (२१-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुलुंड गव्हाणपाडा येथील सदनिकांसाठी माहे मे, २०१५ मध्ये सोडत काढण्यात आली असून बांधकाम अद्याप अपूर्णावस्थेत असल्याने सोडतीतील तब्बल ३६७ विजेत्या अर्जदारांना संपूर्ण रक्कम भरूनही घराचा ताबा म्हाडातर्फे देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे एका वर्षात या घरांच्या किंमती सरासरी ५ लाखांनी वाढल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पक्ररणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अपूर्ण सदनिकांचे बांधकाम तातडीने पूर्ण करुन ताबा देण्यासाठी शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (०६-०६-२०१७) : (१) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दि. ३१.०५.२०१५ रोजी काढण्यात आलेल्या सोडतीमधील संकेत क्र. ३१२ व ३१३ गव्हाणपाडा, मुलुंड (मुंबई) येथील ३६७ अर्जदारांपैकी ३४३ अर्जदार कागदपत्रांच्या

पडताळणीअंती सदनिका मिळण्यासाठी पात्र झाले आहेत. यापैकी संकेत क्र. ३१२ मधील इमारतीला दि. २५.०१.२०१७ रोजी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले असून या संकेत क्रमांकामधील पात्र अर्जदारांना सदनिकेची किंमत अदा करण्यासाठी तात्पुरते देकारपत्र देण्यात आलेले आहे.

संकेत क्र. ३१३ मधील इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले आहे. तथापि त्यास अद्यापपर्यंत भोगवटाप्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही. त्यामुळे संकेत क्र. ३१३ मधील अर्जदारांना सदनिका वितरणाचे तात्पुरते देकारपत्र दिले नसल्यामुळे अर्जदारांनी अद्यापपर्यंत सदनिकेची रक्कम भरलेली नाही. भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे पाठपुरावा सुरु आहे असे उपाध्यक्ष, म्हाडा यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

(२) हे खरे नाही.

मुंबई मंडळाच्या मे २०१५ मधील काढण्यात आलेल्या सोडतीच्या वेळी संकेत क्र. ३१२ मधील सदनिकांची अंदाजित विक्री किंमत रू.४६,६१,४००/- इतकी निश्चित करण्यात आली होती. सुधारित अंदाजित वितरीत किंमत रु. ४७,९०,५०८/- इतकी झालेली आहे. म्हणजेच सदरहू किंमत रु. १,२९,१०८/- इतक्या रक्कमेने वाढलेली आहे. संकेत क्र. ३१३ मधील सदनिकेची सोडतीचे वेळी अंदाजित विक्री किंमत रु. २६,०१,१९२/- आहे. यामध्ये अद्यापपर्यंत कोणतीही वाढ झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर महानगरपालिकेच्या १४ व्या वित्त आयोगातील निम्मी रक्कम घनकचरा व्यवस्थापन व सार्वजनिक स्वच्छतेवर खर्च करण्यात येणार असल्याबाबत

(४४) ७६६१६ (२०-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर शहरातील महानगरपालिकेच्या कचरा संकलनासाठी १४ व्या वित्त आयोगातील निम्मी रक्कम घनकचरा व्यवस्थापन व सार्वजनिक स्वच्छतेवर खर्च करुन ७ कोटी रक्कमेतून नव्या घंटा गाडयांसह १५० कचरा कंटेनर व अन्य साहित्य घेण्याबाबत दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी महानगरपालिकेच्या महासभेत अंतिम निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगर शहरात दररोज १२५ टन कचरा बुरुडगाव कचरा डेपोपर्यंत वाहून नेण्यासाठी सध्या कार्यरत असलेली ५० वाहने अपूरी असल्याने ७ कोटीतून नविन किती साहित्यांची खरेदी करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०५-२०१७) : (१) होय.

१४ व्या वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त रकमेपैकी ५० टक्के रक्कम रु.६,७८,१३,४२५/- इतकी रक्कम घनकचरा व्यवस्थापन व सार्वजनिक स्वच्छतेवर खर्च करण्याच्या प्रस्तावास महानगरपालिका महासभेने दि.२२.१२.२०१६ रोजी मान्यता दिली आहे.

(२) अहमदनगर महानगरपालिका महासभा ठराव क्र.३७, दि.२२.१२.२०१६ अन्वये मान्यता दिल्यानुसार, गारबेज कॉम्पॅक्टर-०३ नग, टाटा-४०७-२० नग, फिरते शौचालय-०२ नग, जेसीबी मशीन-०१ नग, टाटा-एसीई-१० नग, डंपर-०१ नग इत्यादी वाहनांसह कचरा संकलनासाठी आवश्यक त्या साहित्याची खरेदी करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा पालिका रस्त्यांची कामे प्रलंबित असल्याबाबत

(४५) ७६६२४ (२१-०४-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा पालिका रस्त्यासाठी निधी उपलब्ध असून रस्त्यांची कामे करण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार श्रीगोंदा पालिका क्षेत्रातील प्रलंबित असलेल्या रस्त्यांची कामे तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) श्रीगोंदा नगर परिषद सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात रस्ता निधी अंतर्गत वितरित निधीमधून रस्त्याची कामे पूर्ण झाली असून निधी खर्च झालेला आहे.

विशेष रस्ता निधी अंतर्गत वितरित निधीमधून रस्त्याची कामे सुरु असून माहे, जुलै, २०१७ अखेर पूर्ण होण्याचे नियोजित आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योजनेंतर्गत तिसरी फेरनिविदा प्रसिध्द करुन त्यानुषंगाने प्रक्रिया पूर्ण करुन रस्त्याच्या कामासाठीचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत.

कोल्हापूर येथील थेट पाईपलाईन योजनेतील वाशी येथे निकृष्ट आणि तडे गेलेली स्पायरल वेल्डेड पाइप फिट करुन त्यावर माती टाकून बुजविण्यात आल्याबाबत

(४६) ७६६३४ (२१-०४-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील थेट पाईपलाईन योजनेच्या कामातून वाशी येथे निकृष्ट आणि तडे गेलेली १८०० मिलिमीटर व्यासाची स्पायरल वेल्डेड पाइप फिट करून त्यावर माती टाकून बुजविण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माजगाव येथे खोदलेल्या चरीमध्ये चिखलातच मुरमाचा थर टाकून लेव्हल न करताच पाईप बसविल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारे निकृष्ट पाईप फिट केल्यामुळे भविष्यात लेव्हल बदलून पुन्हा गळती लागण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, थेट पाईपलाईन योजनेचे काम करणाऱ्या हैदराबाद येथील जी.के इन्फ्रा या कंपनीचा मनमानी कारभाराची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, तदनुसार दोषी कंपनीविरुध्द शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०५-२०१७) : (१) हे खरे नाही.

• केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी अभियानांतर्गत मंजूर काळम्मावाडी धरणातून कोल्हापूर शहरास थेट पाईपलाईन योजनेचे कामात १८०० मिलिमिटर व्यासाची गुरुत्ववाहिनीची एक पाईप खोदाईचे चरात जोडणेसाठी उतरवत असताना कठीण दगड लागलेमुळे फुटलेचे नोव्हेंबर २०१६ मध्ये निदर्शनास आले होते.

• त्यामुळे सदरचा पाईप बाजूला काढून ठेवणेत येवून त्या ठिकाणी दुसरा सुस्थितीतील पाईप वापरण्यात आला आहे.

(२)

• सदर योजनेअंतर्गत माजगांव येथे माती व मुरुम मिश्रीत जमिनीतील खोदाई करण्यात आली होती.

• त्यावेळी जवळील कॅनॉलचे पाणी सोडणेत आलेमुळे खोदाई करण्यात आलेल्या चरीमध्ये पाणी साठले होते.

• त्यामुळे आवश्यक ते डी-वॉटरिंग करुन पाणी काढणेत येवून तदनंतर त्यावर सोलिंग करुन व मुरुमाचा आवश्यक जाडीचा थर देवून व लेव्हल करुन पाईप बसविण्यात आलेला आहे.

(३) • योग्य प्रकारे सोलिंग/मुरुम बेंडीग करुन घेवून त्यावर पाईप जोडणेत येत असल्याने भविष्यात पाईपची लेव्हल बदलून गळती उदभवणार नसल्याचे कोल्हापूर महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृतपणे उपहारगृह सुरु असल्याबाबत

(४७) ७७४९४ (२१-०४-२०१७). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृतपणे टेरेसवर, पार्किंगच्या जागेत हॉटेल्स, रेस्टॉरंट, उपहारगृह चालू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडे ह्याची सविस्तर माहिती उपलब्ध असतानासुद्धा कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबधित अधिकाऱ्यां विरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०५-२०१७) : (१) अंशत: खरे आहे.
(२) अनधिकृत वापर सुरु असलेल्या ठिकाणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार, संबंधित मिळकत धारकांना महानगरपालिकेमार्फत नोटीसा देऊन कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरातील निवासी भागात असलेल्या जनावरांच्या गोठ्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात येत असल्याबाबत

(४८) ७८१४७ (१३-०४-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील निवासी भागात असलेल्या ११७० जनावरांच्या गोठयामुळे तसेच शहरातील काही गोपालक येण्या-जाण्याचा मार्गावर किंवा सार्वजनिक जागेवर गायी-म्हशी बांधत असल्याने त्याचा त्रास परीसरातील नागरीकांच्या आरोग्यावर होत असतो, ही बाब माहे जानेवारी, २०१७ दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापैकी ११७० गोठ्यांचा त्रास लक्षात घेता, या जनावरांसाठी भांडेवाडी येथे ४६ एकर जागेवर नंदग्राम प्रकल्प उभारला जाणार असुन तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे परंतु त्याला अदयापपर्यंत मंजुरी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नंदग्राम प्रकल्पाच्या प्रस्तावाला मंजुरी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०५-२०१७) : (१) नागपूर महानगरपालिका हद्दीमध्ये एकूण ११०० जनावरांचे गोठे असून, सदरची बाब अंशत: खरी आहे. तथापि, असे निदर्शनास आल्यास किंवा प्राप्त तक्रारीनुसार नागपूर महानगरपालिकेकडून कार्यवाही करण्यात येते.
(२) हे खरे नाही. तथापि, असा प्रस्ताव महापालिका स्तरावर विचाराधीन असल्याचे, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) लागु नाही

येवला शहरातील (जि.नाशिक) सि.स.नं.३८०७ / ३८०८ आणि ३९०७ / ३९०८ मधील ९९ विस्थापित व्यावसायिकांचे पुनर्वसन करण्याबाबत

(४९) ७८१६८ (२१-०४-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला शहरातील (जि.नाशिक) सि.स.नं. ३८०७/३८०८ आणि ३९०७/३९०८ मधील १६६ विस्थापित व्यावसायिकांचे पुनर्वसन करण्यासाठी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक ९ फेब्रुवारी, २०१५ रोजी शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विस्थापित व्यावसायिकांचे पुनर्वसन करण्यासाठी येवले नगरपरिषदेने पाठविलेल्या प्रस्तावास मान्यता देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या विस्थापित व्यावसायिकांचे पुनर्वसनाचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) : (१) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निष्कासीत केलेल्या अतिक्रमण धारकांना, दुकान गाळे वितरणाबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दि. ०९ फेब्रुवारी, २०१५ अन्वये सादर केला होता.
(२) होय.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी उपलब्ध गाळयांचे प्रचलित पध्दतीनुसार जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समिती मार्फत लिलावाने वितरण करण्याबाबत दि. १३ मे, २०१५ रोजीच्या शासनपत्रान्वये जिल्हाधिकारी, नाशिक यांना कळविले आहे.

नाशिक महापालिकेच्या भाभानगरमधील दादासाहेब गायकवाड सभागृहाचे पीओपीचे खांब कोसळून झालेला अपघात

(५०) ७८५७८ (२१-०४-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महापालिकेच्या भाभानगरमधील दादासाहेब गायकवाड सभागृहाचे पीओपीचे खांब कोसळून झालेल्या अपघातात चौघे जण जखमी झाल्याची घटना माहे जानेवारी, २०१७ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनमार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०५-२०१७) : (१) व (२) हे खरे नाही.

नाशिक महानगरपालिकेचे कर्मवीर दादासाहेब गायकवाड सभागृह हे अर्ध खुले सभागृह असून, त्यामध्ये पीओपीचे खांब अस्तित्वात नाहीत.

या सभागृहाच्या छतामध्ये असलेल्या पोकळी झाकण्यासाठी पीओपी शिटचे छोटे छोटे भाग लावण्यात आलेले आहेत. दि.०८.०१.२०१७ रोजी सभागृहात कार्यक्रम चालु असतांना आयोजकांनी उभारलेल्या ध्वनी यंत्रणेच्या हादऱ्याने छताजवळील पीओपी शिटचे तुकडे खाली पडले. याबाबत महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीमध्ये कोणीही जखमी झाल्याचे दिसून आले नाही.

पाहणीनंतर सदर पीओपीचे उर्वरीत छोटे शिट काढून घेण्यात आले असून, सभागृहाचा नियमितपणे वापर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.